# वैश्य सहकारी बँक लि., मुंबई

नोंदणीकृत कार्यालय : ७, तात्या घारपुरे पथ, गिरगांव, मुंबई – ४०० ००४.

स्थापना : १२–११–१९४५ नोंदणी क्र : ९४७५

## ७७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सभासदांना सूचना

वैश्य सहकारी बँक लि., मुंबई या बँकेची ७७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **गुरूवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी ठीक ४.०० वा., दामोदर सभागृह, सोशल सर्व्हिस लिग, एन. एम. जोशी विद्या संकुल, डॉ. आंबेडकर मार्ग, परेल टी. टी., मुंबई – ४०००१२** येथे होणार आहे. सभेतील कामकाजाचे विषय खालील प्रमाणे आहेत :

१) दिनांक २९ सप्टेंबर२०२१ रोजी झालेल्या ऑनलाईन वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचणे आणि त्यास मंजूरी देणे.

२) संचालक मंडळाने सादर केलेला दिनांक ३१ मार्च २०२२ अखेरच्या आर्थिक वर्षाच्या अहवालाची नोंद घेणे व स्विकृत करणे.

३) दिनांक ३१ मार्च २०२२ अखेरच्या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण केलेला ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व वैधानिक लेखापरीक्षकांनी सादर केलेल्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व स्विकृत करणे.

४) आर्थिक वर्ष २०२०-२०२१ च्या दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे व स्विकृत करणे.

५) आर्थिक वर्ष २०२१-२०२२ च्या नफा विभागणीस मंजूरी देणे.

६) आर्थिक वर्ष २०२२-२०२३ च्या अंदाजपत्रकाची व पुढील विकासाच्या योजनांची नोंद घेणे व त्यास मंजूरी देणे.

७) आर्थिक वर्ष २०२३-२०२४ साठी समावर्ती /अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळाला देणे.

८) आर्थिक वर्ष २०२२-२०२३ करिता वैधानिक लेखापरिक्षणासाठी संचालक मंडळाने मेसर्स आर. ए. व्हि. आणि कंपनी, सनदी लेखापाल यांच्या पुर्ननियुक्ती प्रस्तावास रिझर्व्ह बँकेने दिलेल्या मान्यतेची नोंद घेणे.

९) संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्ती स्विकृत करणे व मंजूरी देणे.

१०) बँकेच्या गिरगांव येथील नोंदणीकृत कार्यालय इमारत पुर्नविकासाबाबत नोंद घेणे.

११) वार्षिक सर्वसाधारण सभेतील अनुपस्थित सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

१२) माननीय अध्यक्षांच्या संमतीने येणारे इतर विषय.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन

ठिकाण : मुंबई

दिनांक : ०८/०८/२०२२

**(भारत अ साळवी)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

---

**सूचना :** सदर सभा गणसंख्येच्या अभावी स्थगित झाल्यास उपविधी क्र. ३५(iii) प्रमाणे त्याच ठिकाणी त्याच दिवशी सायंकाळी ४.३० वाजता वरील कामांचा विचार करण्याकरीता सभेचे कामकाज सुरु होईल आणि त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

---

**सभेसंबंधी विशेष सूचना :**

१) वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालकांचा अहवाल आणि ताळेबंद, नफा-तोटा पत्रकाबाबत काही सूचना किंवा जे प्रश्न विचारावयाचे असतील ते सभेपूर्वी सात दिवस म्हणजेच दि. १७ ऑगस्ट २०२२ पर्यंत बँकेच्या गिरगांव येथील नोंदणीकृत कार्यालयात किंवा बँकेच्या लोअर परेल येथील मुख्य कार्यालयात कामकाजाच्या वेळेत लेखी आणून द्यावेत. आयत्यावेळी विचारलेल्या प्रश्नांची दखल घेण्याचे बंधन संचालक मंडळावर राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

२) उपविधी क्र. ३४ (ड) नुसार बँकेच्या वार्षिक अहवालाच्या प्रती सर्व सभासदांना बँकेच्या नजीकच्या शाखेतून अथवा मुख्य कार्यालयातून उपलब्ध केल्या जातील. तसेच सदर अहवाल बँकेच्या **www.vaishyabank.com** या संकेत स्थळावर उपलब्ध असेल.

३) आर्थिक वर्ष २०२१-२०२२ चा वैधानिक लेखापरीक्षकांनी लेखापरीक्षण केलेला अहवाल सभासदांसाठी बँकेच्या लोअर परेल येथील मुख्य कार्यालयात कामकाजाच्या वेळेत वाचण्यासाठी उपलब्ध असेल.

४) सभासदांनी सभेला येते वेळी नोटीस बरोबर दिलेला उपस्थिती अर्ज सभेच्या प्रवेशासाठी भरून सभेच्या ठिकाणी देणे बंधनकारक आहे.

५) भाग प्रमाणपत्रातील नांव, पत्ता अथवा वारसदार बदल असल्यास संबंधीचे पत्र बँकेच्या शेअर विभागास लोअर परेल येथील मुख्य कार्यालयात पाठवावे, त्यानुसार योग्य नोंद करणे शक्य होईल.

६) भाग प्रमाणपत्र प्राप्त केली नसल्यास ती आपले सभासदत्व असलेल्या शाखेतून घेऊन जावीत.

**विशेष सूचना – वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम संपन्न हाईल.**